VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मराठा समाज : एक अभ्यास<br>**कवडे योगेश बाबासाहेब** | १-४ |
| २ | उस्मानाबाद जिल्ह्यातील मध्ययुगीन जलव्यवस्थापन : एक ऐतिहासिक अभ्यास<br>**भाऊसाहेब हौसेराव हुंबे**<br>**डॉ. प्रशांत अर्जूनराव साबळे** | ५-७ |
| ३ | मराठा साम्राज्यातील व्यापार, वाणिज्य, शासन, प्रशासन आणि आंतरराष्ट्रीय संबंध<br>**प्रा. सलामपुरे फुलचंद**<br>**प्रा. वाटोरे सुनिता** | ८-१० |
| ४ | शिवकालीन न्यायव्यवस्था (इ. स. १६३०ते १६८०)<br>**प्रा. बच्छाव अर्चना वालचंद** | ११-१४ |
| ५ | मराठेशाहीतील प्रशासन व्यवस्था<br>**प्रा. डॉ. जिरेवाड लक्ष्मीकांत** | १५-१८ |
| ६ | मराठा आरक्षण : प्रश्न भूकेचा आहे हो..!<br>**डॉ. गणेश मोहिते** | १९-२२ |
| ७ | मराठा साम्राज्य : जाती व्यवस्था आणि बलुतेदारी पध्दत<br>**किशोर भीमराव भद्रे** | २३-२५ |
| ८ | छ. शिवरायांचा राज्य व शासनप्रती दृष्टिकोन<br>**प्रा. डॉ. दत्ता मा. कुंचेलवाड** | २६-३२ |
| ९ | पालि साहित्य व संस्कृती परस्पर संबंध<br>**डॉ. संदीप अर्जुनराव बनसोडे**<br>**शीला विठ्ठलराव डोंगरे** | ३३-३६ |
| १० | मराठा साम्राज्य व लोकसाहित्य<br>**डॉ. सविता खोकले** | ३७-३९ |
| ११ | छत्रपती शिवाजी महाराज आणि मुस्लिम वंश : सलोख्याचे संबंध<br>**घाटगे गौतम व्यंकटी** | ४०-४४ |
| १२ | मराठा साम्राज्य : होळकर घराण्यातील कर्तबगार स्त्रियांचे योगदान<br>**मदन मानसिंग चव्हाण** | ४५-४९ |




Scanned by CamScanner

# ६. मराठा आरक्षण : प्रश्न भूकेचा आहे हो..!

डॉ. गणेश मोहिते
उपप्राचार्य व संशोधन मार्गदर्शक, मराठी विभाग व संशोधन केंद्र, बलभीम महाविद्यालय बीड.

भूक'तशी चिरंतनच.ती फसवी नसतेच कधी.ती फसवतही नाही तुम्हाला,मात्र ती सरळ येते अंगावर. तिला टाळता येत नाही कुणाला;

ती असते अटळ,सनातन.ती

अडकवते चक्रव्यूहात.तीच घडवते,

बिघडवते,तिच्यासाठीच असते धडपड माणसांची;तिचा आगडोंब विझवा म्हणून.तीच ठरते अत्यांतिक गरज जीवनचक्राची.तुम्ही रचत जाता भुकेवर इमले स्वप्नांचे.पण ती नसते त्यांना बांधील.तुम्ही वाढवत जाता तुमच्या गरजा तशी 'ती'वाढत जाते कालपरत्वे.शहाणपण येते तिलाही; तेंव्हा ती सोडत नाही तुमची पाठ.ती शोधायला लावते तुम्हाला तिला शमविण्याचे अनंत मार्ग.तिला नसतो रंग,गंध,जात-पात,धर्म,पंथ;अथवा तुमचं गोत्र,कूळ वगैरे पाहून ठरतही नाही तिचे वर्तन.ती असते मूलतःजैविक.तिचे ते आदिमत्व

समजून घेता येत नाही माणसांना.म्हणून ती निर्माण करीत जाते हरघडी नवा गुंता.तेंव्हा खुंटतात मार्ग.तिने उग्र रुप धारण केले की संघर्ष अटळ ठरतो.तिने निवडला 'संगराचा'मार्ग तर उलथतात भल्या भल्यांच्या गढ्या अन् पालथा पडतो शोषकांचा बुरुज.कारण तिच देत असते हातात 'धोंडा'व्यवस्थेच्या दिशेने भिरकावयाला.तेंव्हा ती निर्माण करीत जाते गुंतागुंत;तसा नवा गुंता वाढत जातो हरघडी.म्हणून तिने प्रश्न जटील- करण्याअगोदर समजून घेतले पाहिजेत.अन्यथा उपाशी पोटी पचत नाही पुन्हा कोणतेच तत्वज्ञान भुकेल्यांना.ते करीत जातात उद्रेक दोन वेळच्या कोरभर भाकरीसाठी..'भाकर आणि भूक'याच गोष्टी असतात तर संघर्षाच्या बुडाखाली..!!

आसमंतात मळभ दाटलेत,रस्त्यांवर मोठ्ठ मोठ्ठे खड्डे पडलेत अन् माणसांच्या चेहर्यावर दुष्काळ.त्यात पावसाचा टिपूस नाही.हवा कोरडी झाली.वेदनांचा आक्रोश रस्त्यांवर आला,धुरांचे लोट